सरपंच, उप सरपंच व सदस्य म्हणुन ग्रामपंचायतीत असतांना केलेला गैरव्यवहार, गैरवर्तणूक याबाबत-वरील कोणत्याही पदावर नसतांना, मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ३९ नुसार कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक-व्हीपीएम-२६९०/[३४१७]/२१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- १८ डिसेंबर १९९१

वाचा:- शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्रमांक-व्हीपीएम-१३८४/१५८१/[२०५८]/२१, दिनांक ९ एप्रिल ~~१९८४~~ १९८५

## परिपत्रक

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९[१] अनुसार कोणताही सदस्य किंवा सरपंच किंवा उपसरपंच, आपले कर्तव्य पार पाडण्यातील गैरवर्तणुकी बद्दल किंवा कोणतीही लांछनास्पद वर्तणूक किंवा आपल्या कर्तव्यात दुर्लक्ष करण्याबद्दल किंवा आपले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ असल्याबद्दल दोषी असेल, किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्यास दुराग्रहाने हेळसांड करीत असेल तर, अशा सदस्यास किंवा सरपंचास किंवा उपसरपंचास अधिकारपदावरुन काढून टाकता येईल. याप्रमाणे काढून टाकण्यात आलेल्या सरपंचाला किंवा उपसरपंचाला स्वेच्छा निर्णयानुसार पंचायतीतूनही काढून टाकता येईल.

परंतु, संबंधित जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाच्या आदेशान्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने पंचायतीस आणि संबंधित व्यक्तीस रीतसर नोटीस देऊन त्यानंतर चौकशी केलेली असल्याखेरीज आणि संबंधित ıx व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आली असल्याखेरीज आणि त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने आपला अहवाल स्थायी समितीस सादर केलेला असल्याखेरीज अशा कोणत्याही व्यक्तीस अधिकारपदावरुन काढून टाकता येणार नाही.

सदरहू कलमाबाबत, भूतपूर्व सरपंच, उपसरपंच, अथवा सदस्य याबाबत कायदेशीर कार्यवाही करता येणे शक्य आहे किंवा कसे यासंबंधी स्पष्टीकरण देतांना शासनाच्या दिनांक ९ एप्रिल १९८५ च्या उपरोल्लिखित पत्रान्वये शासनातर्फे असे कळविण्यात आले होते की, भूतपूर्व सरपंच, यांच्याविरुध्द मागील बॉडीच्या काळात काही तक्रार असेल व मागील बॉडीचे विसर्जनानंतर पुन्हा सदरहू व्यक्ती सरपंच म्हणून निवडून आली असेल तर सदरहू सरपंचाविरुध्द कायद्यानुसार काहीही कार्यवाही करता येत नाही.

याबाबत शासनास आता अशी विचारणा करण्यात आली आहे. की, माजी सरपंच, उप सरपंच अथवा सदस्य यांच्यातर्फे एखादे गैरवर्तन घडल्यास, पुर्वीच्या मुदतीत काही गैरवर्तन अगर गैरव्यवहार घडल्यास त्यास जबाबदार धरुन कार्यवाही करता येईल किंवा कसे ? यासंबंधी खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

जर माजी सरपंच, उपसरपंच अथवा सदस्य यांच्याविरुध्द मागील

पृ.मा.प.

बॉडीच्या काळात तक्रार असेल व मागील बॉडीच्या विसर्जनानंतर सदरहू व्यक्ती पुन्हा नवीन बॉडीमध्ये सरपंच, उपसरपंच अथवा सदस्य म्हणून निवडून आली असेल तर सदरहू व्यक्ती विरुध्द मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ अन्वये कार्यवाही करता येण शक्य नाही. तथापि, त्यांच्यावर त्यांनी केलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने दिवाणी अथवा फौजदारी दावा दाखल करता येऊन त्यानुसार फौजदारी अर्थवा दिवाणी कार्यवाही करता येईल. मात्र, त्याकरिता सदरहू प्रकरणाची जिल्हा परिषदेतर्फे संपूर्ण चौकशी करण्यात येऊन त्यानंतर सदरहू प्रकरण फौजदारी दावा दाखल करण्यास पात्र आहे असे आढळून आल्यास तत्संबंधी फौजदारी गुन्हा संबंधित पोलिस स्टेशनवर फौजदारी कलमान्वये दाखल करण्यात येणे आवश्यक आहे. तसेच दिवाणी दावा दाखल करतांना, त्याकरिताच्या सर्व बाबींची रितसर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

हे परिपत्रक विधी व न्याय विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[भि. बि. जोशी]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
निवड नस्ती कार्यासन क्र. २१